सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
## (आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.0242-222604
E-Mail- rdc.beed2@gmail.com

जा.क्र./मशाका/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/कोरोना विषाणू/2020/कावि- दिनांक:-31/03/2020

## जाहिर आवाहन

भारत सरकार, गृह मंत्रालय यांचेकडील आदेश क्र.40-3/2020 डी. दि.24.03.2020 यांचेकडील सुचनेनुसार कोरोना विषाणू (कोव्हीड 19) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी 21 दिवसाचा लॉकडाऊन देशभरात लागू केला आहे. त्याअनुषंगाने कोरोना विषाणूचा राज्यात वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144(1) (3) अन्वये दि.24 मार्च, 2020 रोजी रात्री 00.00 वा. पासून ते दि.14 एप्रिल, 2020 चे मध्यरात्री 24.00 वा. पर्यंत नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात जमाव बंदी आदेश लागू केलेला आहे.

बीड जिल्ह्यातील अनेक स्वयंसेवी संस्था व नागरिक विविध स्वरुपाची मदत गरजवंतांना देण्यासाठी इच्छुक आहेत. त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, इच्छुक स्वयंसेवी संस्था व नागरिक यांनी विविध स्वरुपाची मदत देणेकामी संबंधित तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर मदतीचे वाटप तहसीलदार यांच्या निर्देशानुसार व नियंत्रणाखाली करण्यात यावे. सदर साहित्य किंवा मदत वाटप करतांना कोव्हिड-19 या विषाणूचा प्रतिबंध करण्यासाठी शासनाने वेळोवेळी दिलेल्या प्रतिबंधात्मक निर्देशांचे तंतोतंत पालन करावे.

मदतीचे वाटप करतांना फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1)(3) चे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा भारतीय दंडसंहिता 1860 (45) याच्या कलम 188 शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि ईतर कलमांसह दिवाणी व फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

31/03/20

(राहुल रेखावार)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,बीड

**प्रत —**
1. सर्व तहसीलदार जि.बीड यांना उचित कार्यवाहीसाठी.
2. जिल्हा माहिती अधिकारी, माहिती कार्यालय बीड यांनी वरीलप्रमाणे तात्काळ प्रेस नोट प्रसिद्ध करावी.

Scanned with CamScanner